# SUCCESS KEY TEST SERIES

X (English)

**(Unit Test-4 Marathi (ch- 13,14,15,16 ))**

Marathi-

DATE:

TIME: 2 hrs

MARKS: 40

SEAT NO:

**विभाग १ - गदय**

**प्र. १ उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)**

**1 A1)** विधान पूर्ण करा. 2

1) माझे नाव मोठ्या अक्षरांत ...............

2) विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर ...............

3) सुदैवाने हा प्रश्न ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या मोठाल्या ............... सोडवला.

4) लेखकाने आंतरशालेय सामन्यात ............... धावा केल्या.

१९४५ साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. पूना क्लबच्या ग्राऊंडवर त्याची एक मॅच झाली. या सामन्याला अर्थात तिकीट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आलेली होती. त्यामुळे आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते. ही मॅच पाहिल्या वर तिचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला. विशेषत: मॅच संपल्या वर खेळाडूंच्या स्वाक्ष-या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे ते दृश्य काळजात भिडले. काही खेळाडू आनंदाने स्वाक्षरी देत होते, तर काही नाकारत होते. हा सर्व सोहळा पाहून मनात आले, की आपणही एक मोठे खेळाडू व्हावे. मग आपल्याभोवतीही अशीच स्वाक्षरीसाठी गर्दी होईल. बस्, तेव्हा पासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली! विशेष म्हणजे वर्गात गणिताच्या तासाला वहीची अनेक पाने माझ्या स्वाक्षरीने भरू लागली. जर चुकूनमाकून शिक्षकांचे माझ्याकडे लक्ष गेलेच व मला प्रश्न विचारलाच तर न कळत माझ्या तोंडातून, 'हाऊज दॅट?' असे उत्तर बाहेर पडे! हे उद्‌गार ऐकून वर्गात एकच हशा होई आणि माझी मान लाजेने खाली होई; पण हीच लाजेने खाली घातलेली मान मी जेव्हा थोड्याच दिवसांनी आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या, तेव्हा सर्वांच्या डोळ्यांतील कौतुकांचे भाव पाहाण्यासाठी अभिमानाने वर झाली. माझे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डा वर झळकले. विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी माझ्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि त्याच वेळी प्रथम मला क्रिकेट खेळत असल्या बद्दल धन्य-धन्य वाटले.

माझ्या मनात क्रिकेटचे बीज पेरले गेले आणि उगवले ते असे.

**A2)** चौकटी पूर्ण करा 2

1) आपल्याभोवतीही अशीच गर्दी होईल - [ ]

2) मनात पेरले गेलेले बीज - [ ]

3) वर्गात सूरु असणारा तास - [ ]

4) लेखकाच्या तोडातून नकळत निघणारे शब्द - [ ]

**A3)** समानार्थी शब्द लिहा 2

1) सही - ...............

2) मार्ग - ...............

3) निवास - ...............

4) अभिमान - ...............

**A4)** स्वमत 2

तुमच्या मते लेखकाच्या मनात पेरले गेलेले क्रिकेटचे बीज कसे उगवले ते लिहा.

**विभाग २ - पदय**

**प्र. २** **खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)**

**1** **A1)** सूचनेप्रमाणे कृती करा 2

झाडाकडे टक लावून पहिल्यानंतर घडणाऱ्या गोष्टी

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं!

**A2)** i) प्रतिशब्द उता-यातून शोधा 1

1) वधू - ...............

2) पर्ण - ...............

ii) प्रश्न तयार करा 1

' ऋषिसारखं ' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**A3)** काव्यसौंदर्य 2

' झाडापासून आनंदी जगणे शिकावे।' या विधानातील अर्थ तुमच्या शब्दात व्यक्त करा.


**A4)** काव्यसौंदर्य 2

‘अलगद उतरतातं दवांचे टपोरे थेंब’ या ओळीचा भावार्थ लिहा.

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा.** **(3)**

**1)** पाठाबाहेरील उदाहरणे शोधून खालील कृती करा.




उदा. जल, नीर, तोय. पाणी.
उदा. पान-झाडाचे (पर्ण) पान (पृष्ठ) पुस्तकाचे पान.

**2)** टीपा लिहा:-
व्युत्पत्ती कोशाचे कार्य?

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) समास -** **(2)**

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| i) बेकायदा | .............. | .............. |
| ii) इकडेतिकडे | .............. | .............. |

**(२) वाक्यप्रचार -** **(2)**

**खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.**

कंसातील वाक्यप्रचारांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.
(हेवा वाटणे, नजर लागणे)
i. रमेशने परीक्षेत चांगले मार्क आणल्याने सर्वांनी केलेले कौतूक ऐकून सुधाला क्षणभर त्याचा मत्सर वाटला.
ii. मानसीचा दिवाणखाना दृष्ट लागावा असा होता.

**प्र. ४ (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**विरामचिन्हे** **(2)**

खालील वाक्यांतील विरामचिन्हे ओळखून लिहा.
रेहाना, जुई, जॉन सगळ्यांनी खेळायला या.

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५ 1. खालील विषयावर पत्र लिहा.** **(5)**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

लोकमान्य विद्यालय, खर्डी
पारितोषिक - बक्षिस वितरण समारंभ
दि.१० जानेवारी दुपारी - ४.००
प्रमुख पाहुणे - श्री. निशिकांत गवळी
अध्यक्ष - श्री. संजय आव्हाडमुख्याध्यापक
मुख्याध्यापक

↓

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

↓

- पारितोषिक प्राप्त विद्यार्थी यांना अभिनंदन करणाने पत्र लिहा.
- पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांच्या पालकांना समारंभासाठी उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा.

**2. बातमी लेखन** **(5)**

**विद्या विकास विद्यालय**
सहकार रोड
जोगेश्वरी (पू), मुंबई ६०

रविवार
दिनांक
२० मार्च १९

वेळ
संध्याकाळी
४.००

**दहावी विद्यार्थी निरोप सभारंभ**
**शाळा सभागृह**

* उपस्थित संस्थाचालक - **प्रकाश पंचाल सर**
* मुख्यालय - **गोविंद महाजन सर**
**(सांस्कृतिक कार्यक्रम ५ ते ६.००)**

**3. कथालेखन** **(5)**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**
**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

शाळेची उन्हाळी सुट्टी सुरू झाली होती. सगळी मुले फक्त मजा करण्याच्या धुंदीत होती. अमर सुद्धा आपली सुट्टी मजेत व निसर्गाच्या सानिध्यात घालवण्यासाठी आजीकडे गावी चालला होता. खिडकीच्या बाजूला बसून पळत्या झाडांची गंमत पाहत होता. खिडकीतून थंड हवा येत होती म्हणून खूप बरे वाटत होते. बसमध्ये खूप गर्दी होती गरमीचा काळ असल्यामुळे जशी दूपार झाली तशी गरम हवा लागू लागली. जोपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा झाडे होती तोपर्यंत थंड हवा लागत होती. पण पुढें पुढे तर झाडे विरळ होत गेली व गरमी वाढू लागली. या बसमध्ये एक आजीबाई होत्या. त्या एका पिशीवीतून दाणे काढून रस्त्यावर टाकत होत्या. ज्या ठिकाणी झाडे नव्हती त्याठिकाणी त्यांनी खूप दाणे टाकले. असे त्यांचे संपूर्ण प्रवासभर चालले होते. अमरला समजत नव्हते की ही आजी नेमके काय करत आहे